“स्व. उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्त्वाचा : एक चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती पदवीचा संशोधन आराखडा

संशोधक

समाधान नारायण दराडे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. खान आय.जी.

राज्यशास्त्र विभागप्रमुख

श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर

ता.माहूर जि.नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रस्तावना

भारताने ब्रिटिशांच्या विरोधात प्रदीर्घ काळ पर्यंत लढा देऊन स्वातंत्र्यप्राप्त केले. स्वातंत्र्य लढ्याच्या काळात सर्व समाजाला सोबत घेत लढ्याची आखणी व बांधणी करण्यातूनच सर्वसमावेशी अशा नेतृत्वाची घडण झाल्यामुळेच स्वातंत्र्यत्तोर काळात आपण स्वीकारलेल्या लोकशाही मूल्यांचा विकास होऊ शकला. भारताला व्यापक विचार करणाऱ्या नेतृत्वाची एक मोठी परंपराच लाभली आहे. राजकीय पर्यायांच्या उपलब्धतेमुळे प्रस्थापित जाती समुहाबरोबरच समाज रचनेत दुय्यम, तिय्यम स्थानी असलेल्या जातीतील लोकानांही आपले जाती निरपेक्ष लोकप्रतिनिधी म्हणून सिध्द करण्याची संधी मिळत गेली. अशाच प्रकारचे लोकप्रतिनिधी म्हणून उत्तमराव राठोड यांच्याकडे पाहिले जाते. समाजाचा विकास होण्यासाठी लोकप्रतिनिधी गुणसंन्न असणे महत्त्वपूर्ण असते. नेतृत्व ही एक व्यापक संकल्पना असून मानवी जिवनाच्या सर्वच क्षेत्रात नेतृत्वाची गरज असते. राजकीय क्षेत्र हे अन्य क्षेत्रांच्या धोरणात्मक दिशा निर्धारणात महत्त्वाची भूमिका बजावत असल्यामुळे लोकशाही राजकीय नेतृत्वाचे विशेष महत्त्व असते.

लोकशाहीच्या विकासाबरोबर जाती निरपेक्ष लोकप्रतिनिधीचा विकास होणे स्वाभाविक असते. लोकप्रतिनिधीसाठी जन्मजात, आर्थिक संपन्नता एवढे पुरेसे नसते. तर त्यासाठी लागणारे गुण आत्मसात करावे लागतात. म्हणूनच लोकप्रतिनिधीकडे एक प्रक्रिया म्हणून पाहिले जाते. सार्वजनिक जीवनात नेता होण्यासाठी अनुयायी तर असावे लागतातच त्या शिवाय स्वीकृत विचारावर निष्ठा, समाज मनाचे विश्लेषण करण्याची क्षमता, पुढाकार वृत्ती आणि विशिष्ट ध्येय उद्दिष्ठाप्रत जाण्यासाठी मार्गदर्शन करण्याची क्षमता लोकप्रतिनिधत असणे महत्त्वाचे असते. उत्तमराव राठोड यांच्यात लोकप्रतिनिधीसाठी लागणारे काही गुण हे त्यांच्या विद्यार्थी दशेपासूनच असल्याचे निदर्शनास येते. उत्तमराव राठोड यांना विद्यार्थी दशेपासूनच नेतृत्व करण्याची गुण जोपासले होते.

महाराष्ट्रात फासेपारधी ही शिकारीवर जगणारी एक प्रमुख जमात आहे. गुन्हेगारीचा शिक्का बसलेल्या या जमातीवर सतत होणाऱ्या अन्याया विरुध्द उत्तमराव राठोड यांनी सभागृहात चर्चा उपस्थित करुन त्यांना न्याय देण्याची भूमिका घेतली. तसेच अनुसूचीत जमातीच्या अज्ञानाचा फायदा घेत त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण केले गेले. शासनाने आदिवासाठी काही कायदे केले असले तरी त्याची अंमलबजावनी प्रामाणिकपणे होत नाही ही बाव लक्षात घेऊन उत्तमरावांनी आदिवासींना न्याय मिळून देण्यासाठी सभागृहात विविध संसदीय आयुधांचा प्रभाविपणे उपयोग करून त्यांचे प्रश्न सोडविण्यास शासनास भाग पाडले.

समाजातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न नेहमीच चर्चेत राहिला आहे. यांचे प्रमुख कारण म्हणजे निधीचा अभाव, दीर्घकालीन नियोजनाचा अभाव, अंमलबजावणी यंत्रणेतील उदासीनता आणि भ्रष्टाचार या सारख्या कारणामुळे सामान्य माणसांना शैक्षणिक, आरोग्य विषयक व अन्य क्षेत्रातील सुविधेपासून वंचित रहावे लागत होते. यासाठी उत्तमरावांनी लोकप्रतिनिधी म्हणून भूमिका पार पाडताना प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरसोयी, शेतकऱ्यांना पिकविमा, कृषी सिंचन व्यवस्था, हमी भाव, कापूस एकाधिकार योजना, पीक कर्ज तसेच आदिवासी भागातील पायाभूत सुविधाची उभारणी करण्यासाठी त्यांनी संसदीय आयुधांचा अवलंब करुन प्रश्नाची सोडवणूक करण्यास शासनास भाग पाडले. वेळोवेळी आलेल्या नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या लोकांचे व्यवस्थित पुर्नवसन व्हावे तसेच सुरक्षित बेरोजगाराच्या प्रश्नाची सोडवणूक व्हावी यासाठी सभागृहामध्ये लक्षवेधी व तारांकित प्रश्न उपस्थित केले आहेत.

महाराष्ट्रात प्रादेशिक विभागातील नैसर्गिक साधन संपत्ती पर्जन्यमानातील तफावत, विकासासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा यातील विषमतेमुळे प्रादेशिक असमतोलाची समस्या ही गंभीर बनली आहे. मराठवाडा हा अन्य भागांच्या तुलनेत मागास राहिला आहे. विकासाचा असमतोल किती आहे त्याचा शोध घेण्यासाठी सभागृहात प्रस्ताव मांडला. ना. यशवंतरावानी समतोल विकासासाठी आपण कटीबध्द असल्याचे म्हटले होते परंतु दुर्देवाने आजचे वास्तव तसे

नाही. ही बाब त्यांनी सभागृहामध्ये निदर्शनास आणून दिली. महाराष्ट्र शासनाने मराठवाडा व विदर्भाला झुकते माप दिले नाही असा आरोप उत्तमरवांनी सभागृहात केला

७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायती स्वावलंबी व्हाव्यात अशा तरतुदी केल्या. परंतु त्याला बगल देणारा एक प्रस्ताव जेव्हा सभागृहात मांडला गेला तेव्हा स्वतंत्र महामंडळा मार्फत नव्हे तर ग्रामपंचायती मार्फतच पाणी पुरवठा झाला पाहिले अशी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बळकटीकरणास सहाय्यभूत ठरेल अशी भूमिका त्यांनी घेतली.

सार्वजनिक रुग्णालयातील डॉक्टरांचा निष्काळजीपणा आणि राज्यपरिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना वाढीव वेतन मिळत नसल्याचा प्रश्न सरकारच्या निदर्शनास आणून दिल्यामुळेच सरकारकडून योग्य ती कारवाई होऊ शकली. थोडक्यात महाराष्ट्र विधीमंडळात वरिष्ट सभागृहात सदस्य म्हणून कार्य करताना अनेक प्रश्नाची सोडवणूक करण्याचा उत्तमरावांनी प्रामाणिक प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

उत्ममरावांनी विधिमंडळामध्ये विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून शेतकरी, कामगार, कष्टकरी, शेतमजूर यांचे प्रश्न पोट तिडखीने मांडले आहेत. एवढेच नाहीत किनवट तालुक्यातील रस्ते, दिवाबत्ती, आरोग्य, विद्युत, कृषी, कुटीर उद्योग, शिक्षण, बंधारे, तलाव इत्यादी मूलभूत व पायाभूत सुविधांची उभारणी केली. याबरोबरच आदिवासी या जमातीचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे या उद्देशाने पश्चिम महाराष्ट्राच्या धरतीवर किनवट तालुक्यात विकासात्मक विविध कल्याणकारी योजना राबविण्यात उत्तमराव राठोड यांचे फार मोठे योगदान आहे.

संशोधन समस्या

संशोधन कार्यात संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे कोणत्याही संशोधनाची सुरूवात करताना सर्वप्रथम संशोधन समस्या निवडणे महत्त्वाचे असते. उत्तमराव राठोड सारख्या बंजारा कुटुंबातील व्यक्तीला राज्य व राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करण्याची संधी मिळाली. त्यांनी

किनवट विधानसभा मतदारसंघाचे २३ वर्षे आणि हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे ११ वर्षे नेतृत्व केले. त्यामुळे एक जबाबदार आणि कार्यतत्पर लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचे कार्य तरुण पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्याच उद्देशाने त्यांनी या भागाचा विकास करण्यासाठी केलेल्या विविध कार्याचा अभ्यास करण्यासाठी **"स्व. उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्त्वाचा : एक चिकित्सक अभ्यास"** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

संशोधन समस्येचे विधान व संरचनात थोड्याफार प्रमाणात गोंधळ निर्माण होऊ शकतो. अशा प्रकारचा गोंधळ टाळण्यासाठी संशोधन समस्येचे नेमक्या शब्दात प्रतिपादन होणं गरजेचे असते. हे नेमकेपण संशोधन प्रश्न, उद्दिष्टे परिकल्पना तसेच कार्यात्मक व्याख्यांच्या लिखाणाने येते. उद्दिष्ट संशोधकाला आणि प्रतिसादकाला जास्त सुस्पष्टता देतात. संशोधनाचा पाया उद्दिष्टे आहे. त्यामुळे ते संपूर्ण संशोधन प्रक्रियेला मार्गदर्शक ठरतात. उद्दिष्टांची यादी फारच लहान किंवा फारच मोठी नसावी. उद्दिष्टांच्या स्पष्टेतून संशोधक नेमके काय शोधणार आहे याचे दिग्दर्शन होते. कोणतेही संशोधन हाती घेत असताना संशोधक काही प्रश्नांवर भर देतो. संशोधक प्रश्नांची रचना वाक्यानुसार करता. काही संशोधक उद्दिष्टांनाच प्रश्नरूपाने मांडतात असे करणे टाळणे पाहिजे. त्यामुळे उद्दिष्टांचे पुनः पुन्हा मांडणी होते.

अभ्यासाच्या स्वरूपावरून आधारित संशोधन परिकल्पनेची मांडणी, रचना करतो. परिकल्पना या पूर्वी झालेल्या संशोधनातून, सैद्धांतिक रचनेतून उगम पावतात. संशोधक पूर्वी झालेल्या संशोधन कार्याचा अनुशंगाने परिकल्पनांचे स्वरूप निश्चित करू शकतो. त्यामुळे संशोधकास संशोधन परिकल्पना लिहिणे शक्य होते. परिकल्पनेच्या मांडणीरून संशोधकास त्या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान आहे हे समजते. तसेच माहिती संकलन आणि विश्लेषण करण्याची दिशाही समजते. त्यामुळे परिकल्पना ही दर्शविणारी असावी. परिक्षणक्षम असावी, स्पष्टीकरणक्षम असावी

आणि दोन चलांतील सहसंबंध प्रस्तुत अभ्यास पूर्ण करण्यासाठी खालील संशोधनाचे उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. उत्तमराव रोठाड यांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२. उत्तमराव रोठाड यांनी लढविलेल्या निवडणुकीचा अभ्यास करणे.

३. उत्तमराव रोठाड यांची सभागृहातील सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत भूमिका जाणून घेणे.

४. उत्तमराव रोठाड यांची सभागृहाती शेतकऱ्या विषयीच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

५. उत्तमराव रोठाड यांची आदिवासी समाजाबद्दलच्या कर्याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके

विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास संशोधकाला प्रथम त्या विषयासंबंधी काहीतरी पूर्वज्ञान असावे लागते. ह्या प्रारंभीकर ज्ञानाच्या आधारे संशोधक आपल्या विषयासंबंधी कोणतेतरी सामान्य अनुमान अथवा सिद्धांत बांधतो. हे अनुमान पुढील संशोधनासाठी मार्गदर्शक ठरते. तो आपले लक्ष आवश्यक तथ्यावर केंद्रीत करतो. आपल्या संशोधनाची दिशा ठरवून त्यासंबंधी पुरावे गोळा करतो व अध्ययनाच्या शेवटच्या चरणात आपले पूर्व अनुमान खरे आहेत अथवा नाही ह्याचा निष्कर्ष काढतो. गृहीतकृत्ये निर्मिती हे संशोधनाचे अंतिम लक्ष नव्हे हे गृहीतकृत्ये सिद्ध करण्यासाठीच अध्ययन करावयाचे नसते. सत्य कोणते हे संशोधकाचे अंतिम लक्ष आहे. सत्य हे वास्तविक तथ्यांच्या आधारे उपलब्ध होत असते. गृहीतकृत्याच्या आधारावर नव्हे. गृहीतकृत्ये ही मुख्य विषयांवर किंवा समस्येवर लक्ष केंद्रीत करण्यास अध्ययनाची दिशा ठरविण्यास सहाय्यक ठरते. संशोधक एका निश्चित दिशेने संशोधन करीत असतो. मग ते गृहीतकृत्ये सत्य होईल किंवा अत्यत निघू शकते. प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. उत्तमराव रोठाड यांची कौटुंबिक पार्श्वभूमी सदन स्वरूपाची होती.

२. उत्तमराव रोठाड यांनी विधानसभा व लोकसभेच्या निवडणुका लढविल्या आहेत.

३. उत्तमराव रोठाड यांची सभागृहातील सामाजिक आणि शैक्षणिक भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे.

४. उत्तमराव रोठाड यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी सभागृहात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

५. उत्तमराव रोठाड यांनी आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिली आहे.

संशोधनाचे महत्त्व

नेतृत्व हा लोकशाहीतील अत्यंत महत्वाचा घटक मानला जाता राजक सहभागातील प्रक्रीया घडते त्यामुळे नेतृत्व हे लोकशाहीला आधिक प्रवळ बनवले १९५७ पासून उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्वाला सुरुवात झाली. ते जवळपास ३५ वर्षे लोकप्रतिनीधी म्हणून महत्त्वपूर्ण कार्य पाडले आहे. या त्यांचे कार्य वाख्यानाजोगे असल्यामुळे उत्तम संसदपटु हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे. तसेच किनवट तालुक्याचे विकासाचे शिल्पकार एक अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यामुळे त्यांचा राजकीय सामाजिक व शैक्षणिक कार्याचा पगडा समाजावर खोलवर बिंबला गेला आहे. त्यामुळे त्यांनी मतदार संघात विकासात्मक कोणते काम केले आहेत का? त्यांचे नेतृत्व कसे व कोणत्या परिस्थीतुन विकसीत होत गेले. या व इतर कारणाचा शोध घेण्यासाठी उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्वार संशोधन होणे महत्त्वाचे होते. म्हणून **"स्व. उत्तमराव राठोड यांच्या राजकीय नेतृत्त्वाचा : एक चिकित्सक अभ्यास"** हा विषय अभ्यासासाठी निवडण्याचे ठरविले आहे.

संशोधन पद्धती

संशोधन हे इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. इंग्रजी शब्दकोषापासून "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे यांचे पुन्हा-पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास

म्हणजेच संशोधन पद्धती होय." प्रत्येक अध्ययन विषयात ज्या संकल्पना, सिद्धांत, निष्कर्ष स्वीकृत झालेले आहेत. त्यांचे प्रामाण्य पुन्हा-पुन्हा तपासून पाहणे हे त्या अध्ययन विषयांच्या अभ्यासकांचे कार्य आहे. जे सिद्धांत विभिन्न शास्त्रात प्रस्थापित झालेले आहेत. त्याची विश्वासार्हता तपासून पाहणे हे संशोधकाचे कार्य आहे. संशोधनामुळे मान्य झालेल्या नवीन तथ्यांच्या आधारावर प्रस्थापित ठरलेल्या सिद्धांतांत काही बदल करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली, तर अशा सिद्धांताची नव्याने मांडणी करण्यासाठी संशोधनाची गरज पडते. शैक्षणिक संशोधन पद्धतीचे वर्गीकरण खालील तीन पद्धतीत करण्यात येते. यामध्ये मूलभूत संशोधन, उपयोजित संशोधन आणि कृती संशोधन असे तीन प्रकार पडतात. प्रस्तुत संशोधन हे उपयोजित संशोधनाशी निगडित असून यासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

तथ्य संकलन पद्धती

संशोधनासाठी लागणारी माहिती संकलित करण्यासाठी मुलाखती, प्रश्नावली, संदर्भग्रंथ, विविध लेखकांचे शोधप्रबंध, विधिमंडळीय कामकाजाचा आढावा, मासिके, साप्ताहिके, निवडणुकांचा संक्षिप्त अहवाल, इंटरनेट इत्यादी साधने उपयोगात आणली आहेत.

संशोधनाची मर्यादा

कोणत्याही प्रकारच्या संशोधनात आवश्यक आणि अभिरूची प्रमाणे संपूर्ण क्षेत्र, चले, जनसंख्या यांचा समावेश करणे कठीण असते. त्यामुळे प्रत्येक अभ्यासाला ठराविक अशा मर्यादा असतात. मर्यादा म्हणजे अशी स्थिती जी संशोधकांच्या नियंत्रणापलीकडची आहे आणि त्यामुळे निष्कर्षावर काही बंधने येऊ शकतात. काहीवेळा माहिती गोळा करण्याची साधनाची पुनर्वैधता करणे शक्य नसते. उत्तमराव राठोड यांचे कार्ये विधिमंडळ व संसदेमध्येही आहे. परंतु या ठिकाणी विधिमंडळीय कामकाजाच्या संबंधित संशोधन करण्याचे निश्चित केले असून ही या संशोधनाची

मर्यादा आहे. म्हणून प्रस्तुत अभ्यासासाठी मुखेड तालुका हा संशोधनाचे कार्य क्षेत्र म्हणून निवडला आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

प्रकरण रचना

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पद्धती, संशोधन मर्यादा, तथ्य संकलन पद्धती इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : उत्तमराव राठोड यांची जडणघडण

प्रस्तुत प्रकरणात मूळ गाव, स्थलांतर, कौटुंबिक पार्श्वभूमी, जन्म व बालपण, शिक्षण, प्रभाव, संघटनेतील कार्य, आंतरजातीय विवाह, राजकीय कारकीर्द, विधानसभा निवडणूक १९५७, विधानसभा निवडणूक १९६२, विधानसभा निवडणूक १९६७, विधानपरिषद १९७२, किनवट विधानसभा निवडणूक १९७८, हिंगोली लोकसभा निवडणूक १९८०, हिंगोली लोकसभा निवडणूक १९८४ आणि हिंगोली लोकसभा निवडणूक १९८९ इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : उत्तमराव राठोड यांची विधिमंडळातील सामाजिक व विकासात्मक भूमिका

प्रस्तुत प्रकरणात सामाजिक व विकासात्मक भूमिकेचा अभ्यास केला आहे. सामाजिक कार्यामध्ये किनवट तालुक्यातील बि-बियाणामध्ये झालेल्या भेसळ करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणे, मराठवाड्यातील दवाखान्यात क्षय रोग्यासाठी खाटा उपलब्ध करुन देणे, औरंगाबाद येथील घाटी रूग्णालयात बालरोग तज्ज्ञांच्या जागेसाठी सिनीअर लेक्चररची नियुक्ती, ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याची व्यवस्था, शेतमजूरांच्या आदर्श वसाहती निर्माण करणे, किनवट तालुक्यातील

कापसाच्या पिकावर औषध फवारणीच्या गैरव्यवहार प्रकरणी नियम ९३ अन्वये उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा करणे, वन्य पशू संवर्धन केंद्राची स्थापना करणे, राष्ट्रीय विकासाच्या कामातील आपल्या जबाबदारीची जाणीव शासकीय कर्मचाऱ्यांना करून देणे, नांदेड जिल्ह्यातील पागे योजना लागू करणे, माहूर देवस्थानाच्या जमिनी कास्त करणाऱ्यांना पिक कर्ज देणे, किनवट तालुक्यात लागलेल्या आगीत नुकसानग्रस्ताना मोबदला मिळणे बाबत, आझाद हिंद सैनिकांना स्वातंत्र्य सैनिकांमध्ये आर्थिक मदत व इतर सवलती देणे, माहूर येथील किल्ला व लेणी झालेली पडझडीची दुरूस्ती करणे, किनवट येथे सुतिकागृहात लेडी डॉक्टरांची नेमणूक करणे, नांदेड जिल्हा परिषदेची सुतिकागृहाची स्थापना करणे, मुंबई शहरातील सोशल क्लब मध्ये चालणाऱ्या गैरप्रकारवर आळा घालणे, नागपूर, पुणे, औरंगाबाद येथे न्यूरॉलॉजी डिपार्टमेंटची उभारणी करणे, वसमत येथे पोलीसांनी केलेला गोळीबार सखोल चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करणे, सातकुंड धरणासाठी संपादित जमिनीचा मोबदला देणे, औरंगाबाद शहरात जायकवाडी प्रकल्पातून पाणी पुरवठा करण्याची योजना कार्यान्वित करणे, वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंब नियोजन विधेयक आणणे, शेतमजूर विधेयक, शेतमालाच्या ढासळणाऱ्या किंमती, ४२ वे संविधान दुरूस्ती विधेयक, किनवट व पुसद तालुक्यातील पेनगंगेच्या थडावर १४० चौ.कि. मीटरचे अभयारण्य उभारणे, कापूस एकाधिकार खरेदी योजनेखाली शेतकऱ्यांना १९७४-७५ चा बोनस न मिळणे व कापूस खरेदी केंद्रावर गाड्या किनवट तालुक्यात अडविणे याबाबत, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील खाटांची संख्या वाढविण्याबाबत, किनवट तालुक्यातील कमी आणेवारी असलेल्या गावांना सवलती देणे आणि किनवट तालुक्यातील गावांचे विद्युतीकरण

प्रकरण चौथे : उत्तमराव राठोड यांचे विधिमंडळातील आदिवासी संबंधित कार्य

प्रस्तुत प्रकरणात हदगाव तालुक्यातील अनुसूचित जातीच्या वसतीगृहासाठी जमीन उपलब्ध करुन देणे, किनवट विभागातील आदिवासी प्रकल्पाची उभारणी करणे, किनवट तालुक्यात आदिवासी विकास गटाची स्थापना करणे, आदिवासी कल्याण योजनेसाठी वेगळया

संचालनालयाची उभारणी करणे, पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर मराठवाड्यातील किनवट व जिंतूर तालुक्यातील आदिवासींना विविध सोयी उपलब्ध करुन देणे, महाराष्ट्रातील आदिवासी विभागातील गावे पक्क्या रस्त्याने जोडणे, आदिवासी प्रदेशातील गावांना वीज पुरवठा करणे, आदिवासी व भूमिहीनांसाठी किनवट तालुक्यात आदर्श वसाहती स्थापन करणे, अर्थसंकल्पीय अधिवेशनात आदिवासींच्या प्रश्नावर सर्वसाधारण चर्चा, किनवट तालुक्यातील जंगल, चुनखडी माती यावर आधारित उद्योगधंदे सुरु करुन आदिवासी व हरिजन यांना रोजगार उपलब्ध करुन देणे, रूरल मॅनपॉवर योजनेखालील किनवट तालुक्यातील बंधारे उभारणे, किनवट तालुक्यातील आदिवासी क्षेत्रातील रस्त्याचे डांबरीकरण करणे आणि मराठवाड्यातील आदिवासी क्षेत्रातील रस्ते बारमाही वाहतूकीयोग्य बनविणे इत्यादी घटकांचा सविस्तर आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : उत्तमराव राठोड यांची विधिमंडळातील शैक्षणिक भूमिका

प्रस्तुत प्रकरणात किनवट व हिमायतनगर तालुक्यातील प्राथमिक शाळेच्या स्थापना, नांदेड येथील कृषी कॉलेजचा स्थापनेत सक्रिय सहभाग, मराठवाड्यातील अंध शाळेला अनुदान मिळवून देणे, समाजशिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची वेतनश्रेणीची सोडवणूक, मुंबई, नागपूर, पुणे आणि औरंगाबाद येथील मेडिकल कॉलेज मधील हाऊस सर्जन व इंटर्नीज यांच्या भत्त्याच्या फरका संदर्भात, विदर्भातील तंत्रनिकेतन शिक्षकांना प्रशिक्षणाचा भत्ता मिळवून दिली, मागासलेल्या व विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या न मिळाल्याने त्यांची होत असलेली आर्थिक व मानसिक कुचंबना, शिष्यवृत्ती प्रदान करण्यासंबंधी कार्यपध्दती, विक्री न झालेली शासकीय प्रकाशने, किनवट महाविद्यालयाकरिता जागेची मागणी, मराठी माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उर्दू ही दुसरी भाषा घेता येणे, महाराष्ट्रातील शासकीय महाविद्यालये, ११ वी व १२ वी च्या वर्गांत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी, मराठवाड्यातील मागासलेल्या जातींसाठी चालविलेली खाजगी वसतीगृहे बंद करण्याचा निर्णय व त्यामुळे विद्यार्थ्यांची झालेली गैरसोय, एस.एस.सी. व १० वी परीक्षेचे कमी प्रमाणात लागलेले निकाल व शिक्षकांची रोखलेली वेतनवाढ, राज्यातील

एन.डी.एस. शिक्षकांना कमी केल्याबाबत, वैद्यकीय महाविद्यालयात प्रदेश मिळविण्यासाठी जाती-जमातीची खोटी प्रमाणपत्रे सादर केल्याबाबतच्या तक्रारी, राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा, विद्यापीठे, महाविद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये आणि माध्यमिक शिक्षण संस्थात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यातील असंतोष, किनवट जि.नांदेड येथील व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरकरिता अद्याप नेमण्यात न आलेला अध्यापक, विविध उद्योगातील ॲप्रेंटिसशिपच्या मागणीबाबत शासनाने घेतलेली भूमिका, मराठवाड्यातील संप काळात काम केलेल्या सुशिक्षित बेकार युवकांनी दिनांक १२- १२-१९७८ रोजी आमदार निवासासमोर धरलेल्या उपोषणाबाबत आणि किनवट तालुक्यातील शाळांना विद्यार्थ्यांच्या पटसंख्येप्रमाणे शिक्षक देण्याबाबत शासनाची भूमिका इत्यादी घटकांचा अभ्यास आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यासाअंती सारांश आणि निष्कर्ष व संशोधनाच्या अनुषंगाने विविध संदर्भग्रंथ सूचीचा आढावा घेण्यात येईल.

संदर्भग्रंथ :

१. पाटील बळीराम हिरामण, १७ जानेवारी १९९६, आलेख समाज प्रगीतचा, प्रकाशन, कै. बळीराम पाटील स्मारक समिती किनवट, जि.नांदेड, प्रथमावृती

२. राठोड उमा, २००९, सिटी ऑफ मांडवी, विजयरत्नम प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती

३. Kinwat, 1957-1978, assembly, Election, Result

४. Hingoli, 1980-1989, Parliament, Election, Result

५. पोपलाई एस. एल., १९५७, नॅशनल पॉलिटिकल ॲण्ड १९५७ इलेक्क्षण इन इंडिया, इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर

६. माहेश्वरी एस. आर., १९६२, जनरल इलेक्क्षण इन इंडिया, इंडिया पब्लिकेशन हाऊस, अलाहाबाद

७. पट्टाभिमराम एम., १९६७, जनरल इलेक्क्षण इन इंडिया, अलाइड पब्लिकेशन, बॉम्बे,

८. नरियन इक्बाल, १९७१, डॉन ऑर टिपूलाइट, पॉलिटिकल चंज इन इंडिया, अग्रवाल अँड कंपनी,

९. छाब्रा हरिंदर के., १९७७, स्टेट पॉलिटिकल इन इंडिया, सुरजित पब्लिकेशन, दिल्ली

१०. आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, जागतिक आरोग्य संघटना युनिसेफ पुरस्कृत पुणे

११. भोळे भा. ल., २०१२, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

१२. प्रधान ग. प्र., २००८, भारतीय राजकारणाचे दौन पैलू लोकशाही आणि समाजवाद, साधना प्रकाशन पुणे

१३. पवार प्रकाश, भाजपा एक वर्चस्व समाज प्रबोधन पत्रिका

१४. व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, महाराष्ट्रातील सत्तांतर, मुंबई ग्रंथाली, १९९६

१५. पळीसकर सुहास- बिरमल नितीन (संपादक), २५ जुलै २००७, महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन,

१६. पाटील व्ही.बी., २०१२, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव

१७. भक्कड ए.एन., २०१२, संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

१८. Dietary Guidelines For Indian, A Manual The National Institute of Natrition

१९. Keny L.B., 1967, Presidential Address, Secreetary, Indian History Congress,

२०. Gisbert P., 2011, Fundamentals of Sociology, Orient Blackswan Pvt. Ltd, Hyderabad,

२१. www.wikipedia.org

संशोधक

समाधान नारायण दराडे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. खान आय.जी.
राज्यशास्त्र विभागप्रमुख
श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर
ता.माहूर जि.नांदेड